सकाळ अॅग्रोवन

डॉ. आदिनाथ ताकटे

भाग : १

# योग्य कांदा जातींची निवड

राज्यात खरीप, रांगडा आणि रब्बी अशा तिन्ही हंगामांत कांदा लागवड होते. हंगामनिहाय लागवडीसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी तसेच कांदा-लसूण संशोधन संचालनालय, राजगुरुनगर, जि. पुणे यांच्याकडून कांद्याच्या विविध जाती विकसित करण्यात आलेल्या आहेत.

## महत्त्वाच्या बाबी

- दर्जेदार आणि भरघोस कांदा उत्पादनासाठी योग्य वाणांची निवड, खात्रीशीर बियाणे तसेच रोपवाटिका व्यवस्थापन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.
- लागवडीसाठी कीड- रोगांना प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी.
- मानेची जाडी, पक्वता कालावधी आणि रंग इत्यादी निकष लक्षात घ्यावेत.
- बियाणे खरेदी करताना शुद्ध, शास्त्रीय पद्धतीने तयार केलेले आणि चालू वर्षाचे असल्याची खात्री करावी.
- कांदा बियाण्याची उगवणशक्ती केवळ एक वर्ष राहते. त्यामुळे लागवडीसाठी ताजे बियाणे घेणे आवश्यक असते. बऱ्याच वेळा कांदा पिकात डेंगळे कांदे येतात आणि अनेक शेतकरी त्याचेच बी धरून लावतात. अशा बियाण्यामुळे उत्पादन कमी येते प्रतही खालावते. केवळ चांगल्या प्रतीच्या कांद्याची निवड करून तयार केलेले बियाणे वापरावे.
- शासनाने अधिकृत केलेल्या बियाणे विक्री केंद्रातून किंवा कृषी विद्यापीठातून बियाणे खरेदी करावे.
- हंगामनिहाय जातीची निवड करून त्या जातीचेच बियाणे खरेदी करावे.

## अर्का कल्याण

- कांदे गोलाकार, रंगाला गर्दलाल आणि चवीने तिखट.
- १०० ते ११० दिवसांत काढणीस येतात.
- सरासरी उत्पादन : हेक्टरी २५ ते ३० टन

## अॅग्री फाउंड लाइट रेड

- नाशिक येथील राष्ट्रीय बागवानी संस्थेद्वारे विकसित.
- कांदे गोल, मध्यम ते मोठे व फिक्कट लाल
- चव तिखट, विद्राव्य घन पदार्थांचे प्रमाण १३ टक्के.
- डेंगळ्याचे प्रमाण कमी
- साठवणुकीस योग्य.
- लागवडीपासून १२५ ते १३० दिवसांत काढणीस येतो.
- सरासरी उत्पादन : हेक्टरी ३० ते ३५ टन.

## अर्का निकेतन

- भारतीय उद्यानविद्या संशोधन संस्था, बंगलोर यांच्याद्वारे विकसित.
- कांदे गोलाकार, रंगाने गुलाबी, बारीक मानेचे, चवीला तिखट.
- साठवण क्षमता : ५ ते ६ महिने
- सरासरी उत्पादन : हेक्टरी २५ ते ३० टन.

- डॉ. आदिनाथ ताकटे,
: ९४०४०३२३८९
(एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)

छोट्या जाहिराती

क्लासिफाइड | विशेष योजना:
सहा ओळींसाठी | २ पेड + १ फ्री,
फक्त ५०० रुपये, | ३ पेड + २ फ्री,
पुढील प्रत्येक ओळी | ५ पेड + ५ फ्री,
ओळीस रु. ८५/- | १०पेड + १२ फ्री

जलसिंचन

बोअरवेल्स

इलेक्ट्रॉनीक व विश्वस्थ यंत्राद्वारे विहीर, बोर पाण्याची जागा खंटकाची खोलीसह दाखवले जाईल. मारुती एजन्सीस. मो.-७७९८०८९८०८

पाटील अॅग्रो इंजिनिअर्स, पुणे नवीन विहीर, बोअरवेल्ससाठी तीन मशिनद्वारे भू-जल संशोधन मोबा. : ९८५०३७१४१३.

उत्कृष्ट दर्जाचा पांढरा रब्बी चना PKV2 75/80 काउंट आणि मॅक्सिकन डबल डॉलर ४२/४४ काउंट चा स्वतः फिल्टर केलेला कोल्ड स्टोरेजचा चना विकणे आहे सं. - न्यु साई कृपा ट्रेडिंग कं. मांडवी रोड सारखणी, ता. किनवट जि. नांदेड- ९४२३६१८५६१/ ९४०४००५२५४

पाडेगाव ऊस संशोधन केंद्र यांची मान्यता असलेली ऊसाची नवीन जात १५०१२ या ऊसाची रोपे मिळतील. सिध्दी अॅग्रोटेक, इचलकरंजी.
मो.८२०८९४१०१७